सोलापूर
तरुण भारत
# सदापुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ४ मार्च २०२६

आतील पानावर
पान २– शमिताला मिळाले नवे प्रेम
पान ३– आमची कधीच मैत्री होऊ शकली नाही
पान ४– समांथाच्या आयुष्यात 'या' लोकांना 'नो एन्ट्री'
पान ५– वडिलांचा मृणालला लग्नासाठी तगादा
पान ७– आजीच्या मतभेदांमुळे अगस्त्य नंदाचं...



# दोन सुपरस्टार चार दशकांनंतर दिसणार एकत्र

'कल्की: २८९८ एडी' हा सिनेमा प्रचंड गाजला होता. २०२४ मध्ये हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. प्रभास, दीपिका पादुकोण तसेच अमिताभ बच्चन यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका होत्या. नाग अश्विन यांनी हा सिनेमा दिग्दर्शित केला होता. चित्रपटांतील सर्वांच्या भूमिका गाजल्या होत्या. आता या चित्रपटाचा सीक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'कल्की: २८९८ एडी'च्या दुसऱ्या भागाच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. अमिताभ बच्चन सध्या या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहेत. हैदराबादमध्ये या सिनेमाचे शूटिंग सुरू आहे. विशेष म्हणजे, चित्रपटाच्या दुसऱ्या भागात लोकप्रिय अभिनेते कमल हासनसुद्धा दिसणार आहेत. जवळजवळ चार दशकांनंतर कमल हासन आणि अमिताभ बच्चन एकत्र दिसणार आहेत. त्यामुळे दोन सुपरस्टार्सना पडद्यावर एकत्र पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या ब्लॉगमध्ये नुकतेच काही फोटो शेअर केले आहेत. शूटिंगदरम्यानचे त्यांचे हे फोटो सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. अमिताभ बच्चन यांचा चित्रपटातील लूकही या फोटोमध्ये दिसत आहे. तसेच, त्यांनी कमल हासन यांच्याबरोबरचेदेखील फोटो शेअर केले आहेत. अमिताभ बच्चन कल्की २८९८ एडीमध्ये अश्वत्थामा या भूमिकेत दिसले होते. आता सीक्वेलमध्येदेखील ते त्याच भूमिकेत दिसणार आहेत. त्यांनी शेअर केलेल्या फोटोमध्ये त्यांचा लूक लक्ष वेधून घेत आहे. दगडावर शांत डोळे झाकून बसलेले लांब दाढी आणि केस, असा त्यांचा लूक आहे. तसेच त्यांच्यासमोर कॅमेऱ्यात दिसत असून, त्यांच्या पाठीमागे काही कलाकारही दिसत आहेत. हा फोटो शेअर करताना त्यांनी एक खास कॅप्शनही लिहिले. दर रविवारी अमिताभ बच्चन मुंबईतील त्यांच्या बंगल्याबाहेर चाहत्यांना भेटतात. मात्र, चित्रपटाचे शूटिंग सुरू असल्यामुळे ते त्यांना भेटू शकले नाहीत. त्याबद्दल त्यांनी लिहिले, मी सांगितले होते की, या रविवारी मी त्यांना भेटू शकत नाही. कारण मी हैदराबादमध्ये शूटिंग करत होतो पण, तरीही ते आले. पुढे त्यांनी असेही लिहिले, माफ करा. आधी काम आणि नंतर आराम. दुसऱ्या फोटोत ते कमल हासन यांच्याशी बोलत असल्याचे दिसत आहे. तसेच, एका फोटोत कमल हासन आणि अमिताभ बच्चन यांनी एकमेकांना मिठी मारल्याचे दिसत आहे. कमल हासन यांच्याबरोबरचा फोटो शेअर करत त्यांनी लिहिले, द ग्रेट कमल हासन यांची भेट झाली. अनेक वर्षांनंतर आम्ही एकत्र काम करत आहोत. आम्ही याआधी गिरफ्तार या चित्रपटात शेवटचे एकत्र काम केले होते. कल्की २ चित्रपटाबद्दल त्यांनी लिहिले, कल्की २चे शूटिंग सुरू झाले आहे. रविवारी तुम्ही मला भेटण्यासाठी आलात, तुमचे हे प्रेम मी कायम लक्षात ठेवेन. पण, येत्या रविवारी नक्कीच सर्वांबरोबर असेन. अमिताभ बच्चन आणि कमल हासन दोघेही 'कल्की: २८९८ एडी' चित्रपटाचा भाग होते. मात्र, त्यांचे एकत्र सीन फारसे नव्हते. दरम्यान, दीपिका पादुकोण पहिल्या भागात महत्त्वाच्या भूमिकेत होती. मात्र, आता दुसऱ्या भागात ती दिसणार नाही.

# जॅकी श्रॉफच्या लेकीची कबुली!

सध्या 'द ५०' या रिॲलिटी शोची भारतात खूप चर्चा आहे. या शोमध्ये शिव ठाकरे, मिस्टर फैजू व कृष्णा श्रॉफ हे टॉप ३ स्पर्धक ठरले. जॅकी श्रॉफ यांची कन्या आणि फिटनेस आयकॉन कृष्णा श्रॉफने या शोमध्ये तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. कृष्णा अफगाणिस्तानचा प्रसिद्ध एमएमए फायटर अब्दुल अझीम बदक्षी याच्याबरोबर नात्यात आहे, तसेच त्याच्याबरोबर लिव्ह- इनमध्ये राहत असल्याची कबुली दिली आहे. ३३ वर्षांच्या कृष्णा श्रॉफने अब्दुल अझीमशी साखरपुडा केल्याच्या चर्चा होत आहेत. पण कृष्णाने अद्याप त्याबद्दल सांगितलेलं नाही. मात्र तिने या शोमध्ये तिने तिची अब्दुलशी झालेली ओळख, भेट आणि लिव्ह-इनचा निर्णय याबद्दल सांगितलं. प्रिन्स नरुला आणि इतरांशी बोलताना कृष्णाने तिची लव्ह स्टोरी सांगितली. त्याची मुंबईत एक मॅच होती. मी तिथे गेले होते, कारण माझा भाऊ टायगर त्याच्या विरोधात खेळणाऱ्या टीमचा सह-मालक होता. तिथे माझं त्याच्याकडे लक्ष गेलं. त्यानंतर मी माझे इन्स्टाग्राम डीएम पाहिले, तिथे त्याने मला 'हाय' असा मेसेज पाठवला होता. मी त्याला रिप्लाय दिला आणि त्याने लगेच माझा नंबर मागितला. आजवर त्याच्या इतक्या आत्मविश्वासाने मला आजवर कोणीच अप्रोच केलं नव्हतं आणि मला त्याची हीच गोष्ट खूप आवडली. आमची मातृभाषा वेगळी आहे. तो पर्शियन बोलतो आणि मी इंग्रजी. आम्हा दोघांचेही हिंदी फार चांगले नाही. आधी ८ महिने आम्ही फक्त व्हिडिओ कॉल आणि फोनवर बोललो, त्यानंतर तो मला भेटण्यासाठी भारतात आला, असं कृष्णा श्रॉफ म्हणाली. पुढे कृष्णा म्हणाली, आम्ही गोव्यात दोन आठवडे एकत्र राहिलो. मग जेव्हा विमानतळावर एकमेकांना बाय म्हणण्याची वेळ आली, तेव्हा आम्हाला वाटलं की आम्ही कदाचित पुन्हा कधीच भेटणार नाही आणि आम्ही रडू लागलो. त्यानंतर तो त्याच्या मित्राला भेटायला दिल्लीला गेला आणि मी मुंबईला परतले. एक दिवस तो मला म्हणाला की तो अफगाणिस्तानला परत जात नाहीये, मग मी त्याला भेटायला दिल्लीला गेले. दिल्लीत आम्ही ३ आठवडे सोबत घालवले. त्या दिवसांत आमचं नातं खूप घट्ट झालं आणि मी त्याला विचारलं की, 'तू मुंबईत माझ्याबरोबर राहशील का?' मग आम्ही एकत्र राहायला सुरुवात केली. पुढे कृष्णा म्हणाली, लोक मला नेहमी विचारतात की माझ्यासाठी प्रेम म्हणजे काय? तर माझ्यासाठी हेच प्रेम आहे की जेव्हा तुम्ही स्वतःपेक्षा समोरच्या व्यक्तीला महत्त्व देता. त्याचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तो खूश असेल तर मी खूश असते. आम्ही कधीही नात्यात यायचा विचार केला नव्हता, पण आमचे विचार आणि स्वभाव एकमेकांशी इतके जुळले की आम्ही एकत्र आलो. आमचा हा प्रवास खूप धाडसी व आव्हानात्मक राहिला आहे.





# शमिताला मिळाले नवे प्रेम!

प्रेम वयाच्या कुठल्याही टप्प्यात प्राप्त होऊ शकते, असे बोलले जाते. आता प्रख्यात अभिनेत्री शिल्पा शेट्टीची बहिण शमिताच्या आयुष्यात प्रेमाने एंट्री केली आहे. शमिता आणि दीपेश शर्मा हे परस्परांच्या प्रेमात पडले असल्याचे समोर आले आहे. दीपेशने शेअर केलेल्या पोस्टमध्ये शमिता दिसून येत आहे. या पोस्टमध्ये त्याने अप्रत्यक्ष स्वरुपात शमितासोबत प्रेमात असल्याची कबुलीच दिली आहे.

दीपेश शर्मा हा टेक्नो आर्टिस्ट आहे. दीपेशसोबतच्या नात्यात ती आनंदी असल्याचे तिच्या काही निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले आहे. दीपेशसोबत ती सध्या बराच वेळ घालवित आहे. दोघेही परस्परांना अधिक समजून घेतल्यावर नात्याची अधिकृत वाच्यता करणार असल्याचे समजते. दीपेशपूर्वी शमिता ही अभिनेता राकेश बापटसोबत रिलेशनशिपमध्ये राहिली होती. दोघांचे नाते बिग बॉसच्या घरातून सुरू झाले होते. तर त्यापूर्वी तिचे नाव उदय चोप्रासोबत जोडले गेले होते. यानंतर राकेश आणि शमिताचा ब्रेकअप झाला होता. शमिताने 'मोहब्बतें' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण पेले होते. यानंतर ती 'फरेब', ' कॅश', 'बेवफा' आणि 'जहर' समवेत अन्य काही चित्रपटांमध्ये दिसून आली होती.



# 'तो' माझ्यासाठी नेहमीच परफेक्शनिस्ट

ज्येष्ठ अभिनेत्री कल्पना अय्यर काही दिवसांपूर्वी त्यांच्या डान्स व्हिडिओमुळे मोठ्या चर्चेत आल्या होत्या. 'रम्बा हो' गाण्यावर त्यांनी केलेला डान्स चर्चेचा विषय ठरला होता. विशेष म्हणजे १९८१ ला प्रदर्शित झालेल्या 'अरमान' चित्रपटातील 'रम्बा हो' या गाण्यातून त्यांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली होती. मात्र, तुम्हाला माहीत आहे का?

आमिर खानचा गाजलेला 'राजा हिंदुस्तानी' चित्रपटातसुद्धा त्या दिसल्या होत्या. 'परदेसी' या लोकप्रिय गाण्यात त्या दिसल्या होत्या. आता कल्पना अय्यर यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत, आमिर खानबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. कल्पना अय्यर यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्या म्हणाल्या, राजा हिंदुस्तानीमधील माझा पोशाख पाहिला की मला नेहमीच मनीष मल्होत्रा यांची खूप आठवण येते. तेव्हा ते तरुण होते आणि त्यांनी नुकतीच कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यांनी माझा पोशाख खूप प्रेम आणि जिव्हाळ्याने तयार केला होता. आमिर खानबरोबर काम करण्याचा अनुभव सांगत त्या म्हणाल्या, आमिर खानबरोबरच्या खूप गोड आठवणी आहेत. लोक म्हणतात तो खूप कटकटी स्वभावाचा आहे, पण मला तसे वाटत नाही. तो खूप प्रामाणिक, शिस्तबद्ध आहे. त्याला काही गोष्टी ठराविक पद्धतीने झाल्या पाहिजेत असे वाटते, त्यात काही चूक आहे असे मला वाटत नाही. जर त्याला उत्तम भूमिका साकारायची असेल, भूमिकेशी प्रामाणिक राहायचे असेल आणि सहकलाकारांनाही बरोबर घेऊन जायचे असेल, तर त्यात काहीच चुकीचे नाही.

'परदेसी' गाण्याच्या शूटिंगची आठवण सांगत कल्पना अय्यर म्हणाल्या, त्या गाण्याचे शूटिंग आम्ही रात्री केले. त्यामध्ये काही बदल करायचे होते, आमिरने मला त्याबद्दल सुचवले होते; मीसुद्धा त्याने सांगितल्याप्रमाणे बदल केले. कल्पना अय्यर यांनी 'राजा हिंदुस्तानी' चित्रपटात आमिर खानबरोबर पहिल्यांदाच काम केले असे नाही. त्याआधी १९९० मधील 'तुम मेरे हो' या चित्रपटात त्यांनी त्याच्याबरोबर काम केले होते. कल्पना अय्यर म्हणाल्या, आमिर माझ्यासाठी नेहमीच परफेक्शनिस्ट आहे. 'तुम मेरे हो'च्या वेळीही तो तसाच होता. 'राजा हिंदुस्तानी'मध्ये जेव्हा आम्ही पुन्हा एकत्र काम केले, तेव्हाही तो तसाच होता. गोष्टी परफेक्ट असल्या पाहिजेत अशी जिद्द त्याच्यात होती. महत्त्वाचे म्हणजे ती गोष्ट फक्त त्याच्या स्वत:पर्यंत मर्यादित नव्हती. इतरांनीही तसेच असावे असे त्याला वाटत असते. अनेकदा त्याचे तसे वागणे कठोर वाटू शकते, पण त्यामुळे सर्वांचाच फायदा होतो. त्या पुढे म्हणाल्या, 'राजा हिंदुस्तानी'मध्ये काम करताना त्याने जे मला बदल सांगितले, त्याचा मला उपयोग झाला. जेव्हा आपण अभिनय करत असतो तेव्हा कोणी बदल सुचवले तर त्याचा त्रास होतो, पण शेवटी त्याचा फायदा होतो. गोष्टी अधिक चांगल्या होतात. मला आमिरबद्दल नेहमीच आदर वाटतो, असे कल्पना अय्यर यांनी सांगितले.

# ‘टॉक्सिक’मध्ये दिसणार अक्षय ओबेरॉय

यशचा बहुप्रतिक्षित चित्रपट टॉक्सिक: अ फेयरी टेल फॉर ग्रोन-अप्स १९ मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होत आहे. चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आणि प्रेक्षकांना तो खूप आवडला. दरम्यान, अभिनेता अक्षय ओबेरॉयचा पहिला लूक प्रदर्शित झाला आहे. तो या चित्रपटात टोनी ही भूमिका साकारताना दिसणार आहे आणि ही भूमिका त्याच्या कारकिर्दीपेक्षा पूर्णपणे वेगळी असल्याचे म्हटले जात आहे. पोस्टरमध्ये अक्षय एका धोकादायक आणि गडद भूमिकेत दिसत आहे. पोस्टरमध्ये अक्षय ओबेरॉय रेट्रो स्टाईलमध्ये दिसत आहे. त्याचे कपडे, केशरचना आणि एकूणच लूक जुन्या काळाची आठवण करून देणारा आहे, परंतु स्टाईल खूपच उग्र आणि कठीण आहे. त्याच्या मागे मृतदेहांचा ढीग दिसतो, जो चित्रपटाच्या हिंसक कथेकडे इशारा करतो. त्याच्या डोळ्यात राग, चेहर्‍यावरील कठोरता आणि त्याच्या देहबोलीतील आत्मविश्वास स्पष्टपणे दिसून येतो. चित्रपटाचे वातावरण गडद आणि कच्चे असल्याचे वर्णन केले आहे. पोस्टरवरूनच असे सूचित होते की कथेत ॲक्शन, भावना आणि संघर्ष असेल. ‘टोनी’चे पात्र शक्तिशाली आहे, परंतु तो अनेक लपलेल्या कथा दडवून ठेवतो. हा चित्रपट निर्मात्या गीता मोहनदास यांनी दिग्दर्शित केला आहे. त्यांच्या चित्रपटांमध्ये अनेकदा खोली आणि विशिष्ट शैली असते आणि टॉक्सिक हा तोच भाव प्रतिबिंबित करतो. या चित्रपटात यश, कियारा अडवाणी, नयनतारा, तारा सुतारिया आणि हुमा कुरेशी अशा दमदार स्टारकास्टचा समावेश आहे. अशा प्रमुख कलाकारांच्या उपस्थितीमुळे हा चित्रपट खास बनतो. प्रेक्षकांना कथा आणि शैलीचे एक शक्तिशाली मिश्रण असलेला मोठ्या प्रमाणात ॲक्शन मनोरंजनाचा चित्रपट अपेक्षित आहे. शिवाय, या चित्रपटाला रणवीर सिंगच्या ब्लॉकबस्टर धुरंधरच्या दुसऱ्या भागाशी तीव्र स्पर्धा मिळेल.






# ‘गोलमाल ५’ चे शूटिंग सुरू

अलिकडेच, रोहित शेट्टीच्या गोलमाल ५ चित्रपटाच्या स्टारकास्टमध्ये अक्षय कुमारची भर पडल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या, ज्यामध्ये आधीच अजय देवगण, अर्शद वारसी, कुणाल खेमू आणि श्रेयस अय्यर यांचा समावेश आहे. चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. आता, एका दक्षिण भारतीय अभिनेत्रीचीही या कलाकारांमध्ये भर पडल्याची बातमी समोर आली आहे. वृत्तानुसार, गोलमाल ५ चे शूटिंग सुरू झाले आहे आणि बहुतेक मुख्य कलाकार पहिल्या शेड्यूलसाठी उपस्थित होते. अजय देवगण देखील लवकरच शूटिंगमध्ये सामील होणार आहे. गोलमाल ५ चे नेमके ठिकाण अद्याप उघड झालेले नाही.

गोलमाल ५ च्या कलाकारांमध्ये एक नवीन चेहरा सामील झाला आहे. गोलमाल ५ मध्ये दक्षिण भारतीय अभिनेत्री प्रियामणी दिसणार आहे. प्रियामणी ही एक लोकप्रिय दक्षिण भारतीय अभिनेत्री आहे. तिची भूमिका गुप्त असली तरी तिने आधीच चित्रीकरण सुरू केले आहे. पहिले वेळापत्रक सुमारे एक महिना चालेल. अक्षय कुमार चित्रपटात असणार असल्याची बातमी आधीच आली होती. तो अजय देवगण आणि त्याच्या टोळीसोबत एक विनोदी दृश्य तयार करणार आहे. अर्शद वारसी, तुषार कपूर, कुणाल खेमू, श्रेयस, जॉनी लिव्हर, संजय मिश्रा, मुकेश तिवारी आणि अश्विनी काळसेकर सारखे दिग्गज कलाकार देखील परत येत आहेत. तथापि, यावेळी करीना कपूर खान चित्रपटात नसू शकते. गोलमाल मालिकेतील पहिला चित्रपट २००६ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि आता २० वर्षे पूर्ण करत आहे. या मालिकेने चार चित्रपटांमध्ये ६०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. गोलमाल ५ हा आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि सर्वात नेत्रदीपक चित्रपट म्हणून ओळखला जात आहे. हा चित्रपट २०२७ च्या सुरुवातीला प्रदर्शित होणार आहे. प्रियामणीने अनेक प्रसिद्ध बॉलीवूड प्रोजेक्ट्समध्ये काम केले आहे, ज्यात शाहरुख खानसोबत द फॅमिली मॅन ही वेब सिरीज आणि जवान हा चित्रपट समाविष्ट आहे. तिने आर्टिकल ३७० या चित्रपटातही काम केले आहे. हिंदी चित्रपटसृष्टीत, ती चेन्नई एक्सप्रेस (डान्स नंबर) आणि मणिरत्नम च्या रावण (कॅमिओ) मध्येही दिसली आहे.



# आमची कधीच मैत्री होऊ शकली नाही



बॉलीवूडमध्ये गेल्या काही वर्षांत अनेक चरित्रपट प्रदर्शित झाले. यापैकीच एक म्हणजे ‘सायना.’ बॅडमिंटनपटू सायना नेहवालवर हा चित्रपट आधारित आहे. बॉलीवूड अभिनेत्री परिणीती चोप्राने यामध्ये मुख्य भूमिका साकारलेली. अशातच आता स्वत: सायनाने याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. परिणीती चोप्राची मुख्य भूमिका असलेला आणि अमोल गुप्ते दिग्दर्शित हा चित्रपट २०२१ मध्ये प्रदर्शित झालेला. परंतु, बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, यातील परिणीतीच्या कामाचं कौतुक झालेलं.

गेल्या महिन्यात परिणीती चोप्राने सायना नेहवालला सोशल मीडियावर अनफॉलो केल्यानंतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. परिणीतीने अनफॉलो केलं असलं तरी सायना तिला फॉलो करत होती. अशातच आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत सायनाने याबद्दल सांगितलं आहे. सायना म्हणाली, मला तर तिने अनफॉलो केलं आहे याबद्दलही माहिती नव्हती. मला असं वाटतं की ती तिच्या कामावर लक्ष केंद्रित करत होती आणि एकदा चित्रपट बनल्यानंतर ती दुसऱ्या कामाकडे लक्ष केंद्रित करत असेल. सायनाने सांगितलं की, चित्रपटासाठी परिणीतीने तिच्याकडून प्रशिक्षण घेतलं होतं; मात्र वेळेअभावी दोघींमध्ये मैत्री निर्माण होऊ शकली नाही. मैत्री होण्यासाठी पुरेसा वेळ असावा लागतो, असंही सायनाने यावेळी म्हटलं आहे. सायना म्हणाली, मैत्री निर्माण होण्यासाठी खूप वेळ असावा लागतो. पण, आमच्याकडे पुरेसा वेळ नव्हता; कारण चित्रपट लवकर प्रदर्शित होणार होता. आम्ही दररोज भेटत नव्हतो. मी तिला बॅडमिंटन कोर्टवर कसं खेळतात, कशा मुव्हमेंट असतात हे शिकवलेलं. तिने कदाचित माझ्या स्वभावाचं निरीक्षणही केलं. तिने खूप मेहनत घेतली आणि खूप चांगलं काम केलं. चित्रपट पाहताना मी खूप भावूक झाले होते. परिणीतीच्या अनफॉलो करण्याबद्दल सायना म्हणाली, कोण तुम्हाला फॉलो करतं आणि कोण अनफॉलो करतं हे फार महत्त्वाचं नसतं. आमच्यामध्ये कुठलाही वाद नव्हता. परिणीतीचं कौतुक करत सायना पुढे म्हणाली, ती खूप लक्ष केंद्रित करून काम करत होती. बॅडमिंटन शिकायला वर्ष लागतं, परंतु ती चार महिन्यांतच शिकली. दिग्दर्शक अमोल गुप्ते मला तिची तालीम करतानाचे व्हिडीओ पाठवायचे. सायनाला मुलाखतीत पुन्हा चित्रपट बनला तर त्यात कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल असं विचारल्यानंतर ती म्हणाली, मला असं वाटतं की श्रद्धा कपूर खूप चांगलं काम करेल. खरंतर तीच या चित्रपटासाठी पहिली पसंती होती. आम्ही अजूनही संपर्कात आहोत आणि मी तिला अनेकदा भेटले आहे. ती खूप गोड मुलगी आहे.

# मोहनलाल यांच्या 'दृश्यम ३'च्या रिलीज डेटची घोषणा

'द'दृश्यम' हा चित्रपट प्रत्येक भाषेत सुपरहिट ठरला आहे. जीतू जोसेफच्या मूळ मल्याळम चित्रपटात साऊथ सुपरस्टार मोहनलाल यांची मुख्य भूमिका आहे. 'दृश्यम'चा तिसरा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. आता या चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. मोहनलाल यांचा 'दृश्यम ३' हा २ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचं पोस्टर शेअर करत ही घोषणा करण्यात आली आहे. अजय देवगणच्या 'दृश्यम ३' आधी मोहनलाल यांचा 'दृश्यम ३' प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. अजय देवगणचा 'दृश्यम ३' हा २ ऑक्टोबर २०२६ रोजी रिलीज होणार आहे. 'दृश्यम ३' मल्याळम आणि हिंदी दोन्हीमध्ये एकाच दिवशी रिलीज होईल अशी चर्चा होती. मात्र आता तसं होणार नाही. 'दृश्यम २'ची गोष्ट जिथे संपली होती तिथूनच 'दृश्यम ३'ची कहाणी सुरु होणार आहे. मोहनलाल स्टारर मल्याळम फिल्मचे दिग्दर्शक जीतू जोसेफ क्राइम थ्रिलर ड्रामाचे मास्टरमाइंड आहेत. जीतू जोसेफ यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत 'दृश्यम ३'च्या कथानकाबाबत मोठी हिंट दिली होती. जीतू जोसेफ म्हणाले की, 'दृश्यम ३'च्या घोषणेनंतर अनेकांनी मला सांगितलं की'दृश्यम २'ची स्क्रिप्ट खूप कमाल होती आणि आता 'दृश्यम ३'कडून अपेक्षा वाढल्या आहेत. पण माझा फोकस सध्या जॉर्जकुट्टी आणि त्याच्या कुटुंबियांवर आहे. 'दृश्यम २' हा चित्रपट पहिल्या 'दृश्यम'पेक्षा वेगळा होता. त्याप्रमाणेच 'दृश्यम ३' हा चित्रपट 'पार्ट २'पेक्षा वेगळा असेल. आहेत. त्यांच्यासोबतच देवदर्शिनी, कोवई सरला, सुब्बू पंचू, मोट्टा राजेंद्रन आणि डॅनियल ॲनी पोप यांसारख्या तमिळ सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकारांची फौज पाहायला मिळणार आहे.





# ४७ वर्षांनंतर रजनीकांत-कमल हासन एकत्र

चाहते ज्याची अनेक दशकांपासून प्रतिक्षा करत होते, तो क्षण अखेर आला आहे. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार्स कमल हासन आणि रजनीकांत तब्बल ४७ वर्षांनंतर एका चित्रपटात दिसणार आहेत. आगामी चित्रपटाचा अधिकृत अनाउंसमेंट प्रोमो प्रदर्शित झाला असून, या व्हिडिओने सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. या बहुप्रतीक्षित चित्रपटाचे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार करणार आहेत, तर रेड जायंट मूव्हीज या चित्रपटाची निर्मिती करत आहेत. तसेच, प्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर याच्याकडे चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी असेल. सुमारे साडेतीन मिनिटांचा हा अनाउंसमेंट व्हिडिओ चाहत्यांसाठी एक मोठी ट्रीट ठरला आहे. प्रोमोच इतका भन्नाट आहे, ज्यामुळे चित्रपटाची आतुरता वाढली आहे. दरम्यान, कमल हासन आणि रजनीकांत यांनी शेवटचे १९७९ मधील 'अलाउद्दीनम अलभुथा विलक्कुम' या फँटसी चित्रपटात एकत्र काम केले होते. त्यानंतर जवळपास ४७ वर्षांनी ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. अनाउंसमेंट व्हिडिओमध्ये दोन्ही सुपरस्टार्समधील मजेशीर नोकझोक पाहायला मिळते. सुरुवातीला ते आपल्या लूक आणि कपड्यांबाबत चर्चा करताना दिसतात. विशेष म्हणजे, दोघेही रेट्रो स्टाइलमध्ये एकसारख्या कपड्यांत दिसतात, ज्यामुळे चाहत्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. व्हिडिओमध्ये दिग्दर्शक नेल्सन आणि संगीतकार अनिरुद्ध यांच्याशी झालेला गमतीशीर संवादही आहे. प्रोमोमधील गाडीतील एक सीन विशेष लक्ष वेधतो. या सीनमध्ये कमल हासन अनिरुद्धला विचारतात, आधी हे सांग, हीरो कोण? त्यावर रजनीकांत मिश्किलपणे उत्तर देतात, विचारताय तर सांगा ना, कोण आहे हीरो? हा संवाद सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या संवादामुळे चित्रपटात कोण हिरो अन् कोण विलेन असेल, याची उत्सुकता वाढली आहे. विशेष म्हणजे, नेल्सन याने यापूर्वी रजनीकांतसोबत 'जेलर' या चित्रपटात काम केले आहे, तर सध्या 'जेलर २'चे शूटिंग सुरू आहे. अशा परिस्थितीत कमल आणि रजनीकांत या जोडीचा हा नवा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कोणते नवे विक्रम प्रस्थापित करतो, याकडे साऱ्या चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.



# समांथाच्या आयुष्यात 'या' लोकांना 'नो एन्ट्री'

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री समांथा रूथ प्रभू सध्या तिच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. नुकतंच अभिनेत्रीच्या 'माँ इंटी बंगाराम' या चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. अशातच समांथाने इन्स्टाग्रामवर 'आस्क मी एनिथिंग' हे सेशन ठेवलं होतं. या सेशन दरम्यान तिनं आपल्या चाहत्यांशी संवाद साधला. ज्यामध्ये समांथाने ट्रोलर्स आणि सोशल मीडियावरील नकारात्मकतेला ती कशी सामोरी जाते, यावर खुलासा केला. आस्क मी एनिथिंग या सेशन दरम्यान सोशल मीडियावरील कौतुक आणि टीका या दोन्ही गोष्टी ती कशी हाताळते, असा प्रश्न एका चाहत्याने समांथाला विचारला होता. त्यावर उत्तर देताना समांथा म्हणाली, मला कौतुकाची फारशी पर्वा नाही आणि ट्रोलर्सचीही नाही. पण जर तुम्ही माझ्या घरात नकारात्मकता आणली, तर मी तुम्हाला ब्लॉक करेन. ज्याप्रमाणे मी माझे घर स्वच्छ ठेवते, तसेच मी हे पेज देखील स्वच्छ ठेवते. ब्लॉक करण्याचा अर्थ असा नाही की तुमच्या टीकेचा माझ्यावर परिणाम झाला आहे, त्याचा अर्थ असा आहे की आता येथे तुमचे स्वागत केले जाणार नाही. समांथाच्या या स्पष्टवक्तेपणाचे सोशल मीडियावर भरभरून कौतुक होत आहे. समांथाने गेल्या वर्षी प्रसिद्ध चित्रपट निर्माते राज निदिमोरूशी १ डिसेंबर २०२५ लग्नगाठ बांधली. कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिचा आगामी चित्रपट 'माँ इंटी बंगाराम' येत्या १५ मे २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाची सह- निर्मिती राज निदिमोरू, समांथा आणि हिमांक दुव्वुरु यांनी केली आहे. याशिवाय समांथा ही 'राज आणि डीके' यांच्या 'रक्त ब्रह्मांड: द ब्लडी किंगडम' या बहुचर्चित वेबसीरिजमध्येही एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. एकामागून एक ॲक्शन-पॅक प्रोजेक्ट्समुळे समांथा २०२६ मध्ये बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे.




# राजा शिवाजी चित्रपटाचे पहिले पोस्टर रिलीज

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले होते, जेव्हा देशाचा बराचसा भाग परकीय राजवटीखाली होता. त्यांनी स्वराज्यासाठी लढा दिला आणि रयतेचे राज्य निर्माण केले. शिवजयंती निमित्त अभिनेता रितेश देशमुखने छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाही कारकीर्दीला चित्रभाषेचे स्वरुप दिले आहे. आगामी 'राजा शिवाजी' चित्रपटाचे पहिले पोस्टर रिलीज केले आहे. या पोस्टरसोबत चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर करण्यात आली आहे.

राजा शिवाजी चित्रपटाच्या पहिल्या खास पोस्टरमध्ये रितेश रणांगणावर उभा आहे, एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात भगवा ध्वज आहे. या लूकवरून स्पष्ट होते की हा चित्रपट शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठीच्या संघर्षाचे चित्रण करणार असणार आहे. रितेश देशमुख छत्रपती शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहे. त्यामुळे मोठ्या पडद्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची यशोगाथा पाहणे मोठी पर्वणी असणार आहे. रितेशची पत्नी जिनिलिया देशमुख हिने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. या पोस्टरच्या कॅप्शनमध्ये, आज तोच दिवस आहे, जेव्हा अंधाराला पहिल्यांदा प्रकाशाचं स्वप्न पडलं.. जेव्हा इतिहासानं नव्या भविष्याकडे पाउल उचललं जेव्हा आपल्या मातीला मिळाला नवा स्वाभिमान..शिवजयंतीच्या पावन निमित्ताने, सादर करीत आहे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित राजा शिवाजी या चित्रपटाचं पहिलं पोस्टर! असे लिहिले आहे.

हा चित्रपट १ मे २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ज्योती देशपांडे आणि जेनेलिया देशमुख यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अजय-अतुल या प्रसिद्ध जोडीने संगीत दिले आहे. या चित्रपटात संजय दत्त, विद्या बालन, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, फरदीन खान आणि भाग्यश्री या कलाकारांच्या महत्वाच्या भूमिका आहेत.

रितेशच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, तो शेवटचा २०२५ मध्ये 'हाऊसफुल ५' आणि 'मस्ती ४' मध्ये दिसला होता. या वर्षी त्याचा 'धमाल ' रिलीज होणार आहे. सध्या तो बिग बॉस मराठी सीझन ६ चे होस्टिंग करत आहे.

# 'नॅशनल क्रश' गिरीजाच्या वडीलांची खंत...



मराठमोळी अभिनेत्री गिरीजा ओक तिच्या एका मुलाखतीनंतर 'नॅशनल क्रश' बनली आणि सोशल मीडियावर अनेकजण एकच प्रश्न विचारू लागले की, 'निळ्या साडीतील ही अभिनेत्री आहे तरी कोण?' गिरीजा ओक हे नाव मराठी कलाविश्वात जरी लोकप्रिय असलं तरी सोशल मीडियामुळे ती देशभरात प्रकाशझोतात आली. ती ट्रेंड होत असतानाच काहींनी तिचे मॉर्फ केलेले, एडिट केलेले फोटोसुद्धा पोस्ट केले. याबद्दल खुद्द गिरीजाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. इंटरनेटवरच्या गोष्टी कायम असतात, त्या पुसल्या जात नाहीत, त्यामुळे असं कृत्य करू नका.. असं आवाहन तिने केलं होतं. त्यानंतर आता पहिल्यांदाच गिरीजाचे वडील ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. गिरीश त्यांच्या मुलीबद्दल आणि ट्रोलिंगबद्दल मोकळेपणे व्यक्त झाले. मला गिरीजाचं आणि तिच्या कामाचं अर्थातच खूप कौतुक आहे. एकंदर ती जे काही करते, त्याचं मला नेहमीच अप्रूप वाटतं. पण तिच्या फोटोंवर येणाऱ्या काही कमेंट्स अत्यंत वाईट असतात. बिनकामाची, रिकामटेकडी लोकं स्वत:ची ओळख लपवून असे कमेंट्स करतात. अशा लोकांची बौद्धिक कुवत किती आहे हे मला माहीत नाही, परंतु पड्यामाडून अशी टिप्पणी करणं चुकीचं आहे. ही वृत्तीच मला किळसवाणी वाटते. काही लोकांना या गोष्टींचा प्रचंड मानसिक त्रास होतो, असं ते म्हणाले. सोशल मीडियावरील ट्रोलिंगबद्दल ते पुढे म्हणाले, सोशल मीडियावर असे चुकीचे कमेंट्स करणाऱ्यांकडे काहीच कामधंदे नसतात. त्यांच्यावर कसलाच निर्बंध नाही. आपण काय लिहितोय, हेसुद्धा त्यांना कळत नाही. काहीजण सोशल मीडियावर सचिन पिळगांवकरांनाही ट्रोल करत होते. ते बालपणापासून या फिल्म इंडस्ट्रीत काम करत आहेत. या ट्रोलर्सची त्यांच्याविषयी बोलण्याची तरी लायकी आहे का? हे सर्व पाहून मला खूपच वाईट वाटतं. अर्थात मी कितीही बोललो तरी हे काही थांबणारं नाहीये. याआधी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनीसुद्धा सचिन पिळगांवकरांना ट्रोल करणाऱ्यांना सुनावलं होतं. सचिनने आज जे स्थान मिळवलं आहे, ते काही फुकट किंवा वारशाने मिळावलेलं नाही. त्यासाठी त्याने रक्ताचं पाणी केलं आहे. त्याच्या ज्ञानावर कुणी एक तरी बोट ठेवून दाखवेल का? कुणाची हिंमत आहे का? ट्रोल करणार्यांना हे माहितच नसतं की समोरच्या माणसाने किती मेहनत घेतली आहे. आजकाल ट्रोलिंग हा लोकांच्या फावल्या वेळेचा छंदच झाला आहे, असं ते म्हणाले होते.

# वडिलांचा मृणालला लग्नासाठी तगादा



मृणाल ठाकूर आणि सिद्धांत चतुर्वेदी सध्या त्यांच्या 'दो दिवाने शहर में' या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने मृणाल आणि सिद्धांत यांनी लग्न आणि त्यासोबत येणाऱ्या कौटुंबिक दबावाबद्दल प्रतिक्रिया दिली. मृणाल ठाकूर ३३ वर्षांची आहे. ती सध्या सिंगल आहे. मृणालने सांगितलं की तिच्या घरी आता रोजच लग्नाचा विषय निघतो. काल रात्रीच माझे बाबा मला म्हणाले, 'आता तू सेटल व्हायला पाहिजे.' त्यावर मी म्हटलं, 'तुम्ही तुमच्या बहिणीला फोन करून तुमच्या मुलीसाठी एखादा चांगला मुलगा आहे का? असं का विचारत नाही.' त्यांनी मलाच विचारलं, 'कुठे आहे मुलगा?' आणि मी उत्तर दिलं, 'हेच तर मला विचारायचंय मुलगा कुठे आहे?' जर तुम्हीच मला हा प्रश्न विचारत असाल, तर मी काय सांगणार? असं मृणाल ठाकूर म्हणाली.

मृणालने अरेंज मॅरेजबद्दल मोठं विधान केलं. तिला अरेंज मॅरेज म्हणजेच कुटुंबाने ठरवलेल्या लग्नाची अजिबात भीती वाटत नाही. पण सध्या माझ्यासाठी कोणतंच स्थळ आलेलं नाहीये. अरेंज मॅरेजची संकल्पना काळाप्रमाणे कशी बदलली आहे, यावरही मृणालने आपलं मत मांडलं. ती म्हणाली, एक महत्वाची गोष्ट म्हणजे लग्न फक्त करायचं म्हणून लग्न करू नये. पूर्वी अरेंज मॅरेज म्हणजे पालकांनी तुमची कोणाशी तरी ओळख करून देणं असायचं. आता मित्र-मैत्रिणी सुद्धा एकमेकांची ओळख करून देतात, ते देखील एक प्रकारचं अरेंज मॅरेजच आहे. पण शेवटी प्रेमविवाह असो वा अरेंज मॅरेज, सर्वात महत्वाचं म्हणजे दोन व्यक्तींमध्ये संवाद व्हायला हवा आणि त्यांचे विचार पटले पाहिजेत. मृणालच्या मते लग्न करणाऱ्या दोघांचे एकमेकांशी विचार पटणं खूप गरजेचं आहे, पण त्याचबरोबर कुटुंबांची संमतीही महत्वाची आहे. कारण लग्न हे फक्त एका स्त्री आणि पुरुषाचं नसते, तर ते दोन कुटुंबांमधील नातं असते. जर सर्वांची संमती असेल, तर लग्नाला काय हरकत आहे? असं मृणाल म्हणाली.

सिद्धांत चतुर्वेदीने लग्नाबद्दलच्या त्याच्या घरच्यांच्या अपेक्षांबद्दल सांगितलं. त्यावर मृणाल मस्करीत म्हणाली, त्याच्या आईला तर नातवंड हवी आहेत. त्या म्हणतात, 'तुम्ही सगळे कामावर जा, मला फक्त खेळायला नातवंडं हवी आहेत.' यावर गमतीत सिद्धांत म्हणाला, मी त्यांना तेच सांगतो, त्यासाठी मला लग्न करण्याची काय गरज आहे? माझा लग्नाच्या पारंपरिक पद्धतीवर विश्वास आहे. माझ्या मते लग्न हे दोन कुटुंबांचे मिलन आहे. त्यामुळे लग्न ते योग्य पद्धतीने होणं गरजेचं आहे, कारण तुम्हाला तुमचं संपूर्ण आयुष्य कोणासोबत तरी घालवायचं असतं. त्यासाठी घाई करण्याची गरज नाही. फक्त करायचे म्हणून लग्न करू नये, असा सल्ला सिद्धांतने दिला.



# संगीताचे स्वतंत्र घराणे: शंकर जयकिशन

**हवा में उडता जाये मोरा लाल दुपट्टा मलमल का इधर उधर लहराये मोरा लाल दुपट्टा मलमलका.. हो जी.' १९४९ सालच्या 'बरसात' या आर.के. बॅनर च्या पहिल्या चित्रपटातील गाण्याच्या पहिल्याच अंतर्यात शंकर जयकिशन (एस.जे.) यांनी लता यांच्या कोवळ्या स्वरातून उच्छृंखलपणे बेहोश नजाकतीने जी दिलफेक अदाकारी सादर केली, त्याची जादू आजही कायम आहे. 'मोरा लाल दुपट्टा' ही अक्षरे घोळवणारे सूर तिच्या खट्याळ लडिवाळ वृत्तीची साक्ष देतात. अंतऱ्याच्या समेवर येणारे 'होऽ जीऽऽ होऽजीऽऽ' हे शब्द स्वराघातांनी नटूनथटून येतात. ही आहे संगीतकाराची किमया. राज कपूर या संगीताचे ज्ञान असलेल्या प्रतिभावंत दिग्दर्शकाच्या ग्रुपमध्ये 'एस.जे.' यांचे स्थान पक्के झाले.**

सुरुवातीलाच तारुण्यसुलभ जाणिवेने मोहरून आनंदाच्या ऊर्मी उधळणाऱ्या या गाण्यातील व्हायोलीन व तालवाद्याच्या करामतीने या गाण्याने कीर्तिमान स्थापित केले. 'जिया बेकरार है छायी बहार है आजा मोरे बालमा तेरा इंतजार है' नटूनथटून वाट पाहताना नेत्रातून बरसात बरसल्यासारखे अश्रू ओघळायला लागले. विरह व्याकूळ मनाची घालमेल दर्शविणारे हे मिश्र पिलू रागातील गीत व्हायोलीनच्या सुरावटीत एस. जे. यांनी अक्षरशः सजविले आहे. त्यांनी चित्रपट संगीत सोपे केले. चाली सुलभ रचल्या. म्हणूनच लग्नाच्या वरातीपासून पानठेल्यावरील रसिकांपर्यंत सिने संगीत पोहोचले.

शंकर जयकिशन यांनी बरसात चित्रपटापासून अखेरपर्यंत संगीताची मुसळधार धो धो धारा बरसविली. 'तेरे बिना आग ये चांदणी तूऽऽ आऽऽ जा..' १९५१ सालच्या 'आवारा' चित्रपटात स्वप्न दृश्यातील या गीताद्वारे एसजेंनी एकाच गाण्याला तीन वेगवेगळ्या चाली देण्याचे सृजन विहंगम पद्धतीने सादर करून अभिनव अदाकारी रुजवली आहे. तत्पूर्वी कुणी केले नसेल. त्या काळातील स्वर्ण संगीताचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून या गाण्याला मान्यता आहे. हे स्वप्न दृश्य केवळ गाणे व पार्श्वसंगीताच्या कौशल्यावर यशस्वी झाले. वरील गाण्यापासून लता यांच्या हायपिचचा उपयोग एसजेंनी मुक्तपणे करून संगीतात एक पायंडा पाडला. तसाच प्रयोग मोहम्मद रफींसाठीही केला. रफींना गायकी अभिनयात गायला लावले. एसजे व रफीसाहेब ज्या कलाकारावर गाणी करायचे त्या कलाकाराच्या वैशिष्ट्यपूर्ण लकबीला साजेल अशी गाणी करण्यात वाकबगार होते. शास्त्रीय संगीतावर आधारित त्यांची अनेक सुश्राव्य गाणी अजरामर आहेत. 'रसिक बलमा! हायेऽऽ दिल क्यू लगाया...' १९५६ सालच्या 'चोरी चोरी' चित्रपटातील नरगिस यांच्यावर चित्रित झालेली शुद्ध कल्याण रागातील ही चीज स्वरकोकिळेच्या स्वरात बांधून श्रवणीय केली. सुरुवातीपासूनच सतारीचा प्रयोग करुन केहरवा या तालाच्या तबल्यावरील ठेक्याने व बासरीच्या सुरांनी मजा आणली. 'मनभावन के घर जाये गोरी' वरील चित्रपटातील खमाज रागातील या नृत्यगीतात लता व आशा यांनी स्वरांचा खजानाच रिता केला. 'चोरी चोरी' या चित्रपटातील नेहमीची प्रसिद्ध गाणी सोडून एसजेंचे शास्त्रीय सांगितीक कौशल्य दर्शित केले. राज कपूर यांना भैरवी रागावर अतोनात प्रेम होते. एसजे यांच्याकडून जास्त करून या रागावरील गाणी बसवून घ्यायचे. 'झुमता मोसम मस्त महिना चांदसी गोरी एक हसीना' 'जंगली'मधील याहूऽऽ, वरील गाण्यात तर 'उजाला'मधील वरील गाण्यात अनोख्या अंदाजात अनोखे बोल संगीतात बांधण्याचे कसब एसजेंनी सिद्ध केले. अनावर प्रीतीचा प्रत्यय देणाऱ्या या गाण्यात मन्ना डे व लता यांनीही स्वरांची मस्ती उजागर केली. 'अजीब दास्ता है ये कहाँ शुरु कहाँ खतम' शैलेंद्र यांच्या उत्कट शायरीत रचलेले हे गाणे म्हणजे अव्यक्त प्रेमाचा हुंकार, भावनांचा कल्लोळ व अंतर्मनातील घालमेल संगीत कळेत लता यांच्याकडून परिवर्तित करणार्‍या एसजेंच्या संगीताचे महान यश. प्रेमातील यशाबद्दल साशंक असलेल्या नायकाचे स्वर व्हायोलिनच्या वाद्याने थोडे गर्द केले. गायकाच्या भावनेला वाद्यानमधून विरळ वा गर्द करण्याचे कसब फक्त एसजे या संगीतकारात होते.

'तू प्यार का सागर है तेरी एक बुंद के प्यासे हम' एसजे व मन्ना डे यांच्या एकत्र गायन प्रयोगातले हे सर्वात यशस्वी गाणे १९५६ सालच्या 'सीमा' चित्रपटातील आहे. मन्ना डे यांच्याकडून प्रार्थनेच्या पवित्र भावनेने कोरसमधील हमिंगच्या साथीत हे प्रार्थनास्वरूप गीत देशभर प्रसिद्ध झाले. 'नन्हे मुन्ने बच्चे तेरी मुठीमे क्या है' 'बुटपॉलिश' चित्रपटातील या गीताने त्या काळात घराघरात स्थान मिळविले होते. मन्ना डे या दिग्गज गायकाने लहान अजाण मुलांचे भावविश्व रंगविलेले श्रवण करताना नकळत डोळ्याच्या कडा ओल्या होतात. केवळ स्वर्गीय! १५ ऑक्टोबर १९२२ रोजी हैदराबादला जन्मलेले शंकरसिंह रघुवंशी उर्फ 'शंकर' व ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बलसाड येथे जन्मलेले जयकिशन दयाभाई पांचाळ उर्फ 'जयकिशन' यांची भेट मुंबईस पृथ्वी थिएटरमध्ये झाली. शंकर हे सतार पियानो अकॉर्डियन ई. वाद्यात तर जयकिशन हार्मोनियम वाद्यात निष्णात होते. याच दरम्यान राज कपूर 'बरसात' चित्रपटाची निर्मिती करीत होते. त्यांनी या जोडीला 'बरसात' चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी दिली. पहिल्याच चित्रपटाचे संगीत व चित्रपट ही 'ऑल टाईम ब्लॉक बॉस्टर' ठरल्यामुळे ही संगीतकार जोडी प्रसिद्ध झाली. चित्रपटसृष्टीत १९४९ ते १९७१ पर्यंत ते संगीत सम्राट होते. दोघांनी मिळून १०० च्या वर चित्रपटाना संगीत दिले. १९६८ साली त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला. त्याच्या संगीताला ९ फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले. २०१३ साली त्यांचे फोटो असलेले पोस्टाचे तिकीट काढले. जयकिशन यांचा देहांत १२ सप्टेंबर १९७१ रोजी झाला. त्यानंतर शंकर एकाकी पडले. १९७१ ते १९८६ पर्यंत त्यांनी शंकर जयकिशन नावाने आठ चित्रपटात संगीत दिले. २६ एप्रिल १९८७ रोजी शंकर देखील काळाच्या स्वाधीन झाले. हिंदी चित्रपटाचा डंका पसरविणारे शंकर जयकिशन यांचे दीर्घ पर्व समाप्त झाले. त्यांचेच शाश्वत गाणे सिद्ध झाले. 'जिंदगी एक सफर है सुहाना यहाँ कल क्या हो किसने जाना...'

**रमेश पोफळी**

# ...तर मी चित्रपट निर्मिती सोडेन!

'द केरला स्टोरी २: गोज बियॉन्ड' या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला. ट्रेलर पाहिल्यानंतर वादाला सुरुवात झाली. कामाख्या नारायण सिंह यांनी 'द केरला स्टोरी २: गोज बियॉन्ड'चे दिग्दर्शन केले आहे. चित्रपटावर होणाऱ्या टीकेनंतर त्यांनी उत्तर दिले आहे. कामाख्या नारायण सिंह यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, मी डॉक्युमेंटरींची निर्मिती केली आहे. मी नेहमी समाजातील वाईट प्रथा तसेच समस्यांवर भाष्य करणारे चित्रपट बनवरले आहेत; जे प्रश्न उपस्थित करतात आणि लोकांना आजूबाजूला काय घडत आहे यावर विचार करण्यास प्रवृत्त करतात, म्हणूनच एखाद्या चित्रपट किंवा डॉक्युमेंटरीच्या प्रदर्शनापूर्वी मी त्या विषयाचा सखोल अभ्यास करतो, त्यामुळे समस्या पूर्णपणे समजून घेता येतात. पुढे ते म्हणाले, मी माझे काम पूर्ण प्रामाणिकपणे केले आहे, माझ्यावर विश्वास ठेवा; जर चित्रपटात आम्ही काही चुकीचे दाखवले असेल तर मी चित्रपट निर्मिती सोडेन. चित्रपट निर्माते विपुल शाह यांनीदेखील यावर वक्तव्य केले आहे. ते म्हणाले, आम्ही केरळच्या विरोधात नाही, केरळ देवभूमी आहे. राज्यातील ज्या वाईट गोष्टी आहेत, त्या शक्य तितक्या लवकर नाहीशा व्हाव्यात हीच आमची इच्छा आहे. काहींनी चित्रपटाचे प्रदर्शन थांबवावे यासाठी याचिका दाखल केल्या. लोकप्रिय दिग्दर्शक अनुराग कश्यपने देखील यावर टीका केली होती. तो म्हणाला होता की, द केरला स्टोरी हा चित्रपट प्रोपगंडा आहे. ट्रेलरमध्ये ज्या पद्धतीने गोमांस खाऊ घालताना दिसत आहे, तसे कोण खाऊ घालते; असे तर कोणी खिचडीसुद्धा खात नाही. लोकांमध्ये फूट पडावी असे त्यांना वाटते. अनुराग कश्यप असेही म्हणाला, चित्रपट निर्माता लोभी आहे, त्याला फक्त पैसे कमवायचे आहेत. याबरोबरच केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनीदेखील यावर टीका केली होती. त्यांनी एक्स अकाउंटवर लिहिले होते की, या चित्रपटाचा सीक्वेल काढणे हा राज्यातील जातीय सलोखा बिघडवण्याचा आणखी एक प्रयत्न आहे. पहिल्या भागात आम्ही त्यांचा जातीय अजेंडा आणि खोटेपणा उघडपणे पाहिला आहे. धर्मनिरपेक्ष मूल्यांना बदनाम करण्याचा हा आणखी एक प्रयत्न आहे. त्यांचा तो प्रयत्न राज्यातील जनता पुन्हा एकदा तिरस्काराने नाकारेल. दरम्यान, 'द केरला स्टोरी २: गोज बियॉन्ड' हा चित्रपट २७ फेब्रुवारीला प्रदर्शित झाला आहे.





# 'धुरंधर : द रिव्हेंज'मध्ये इरमरान हाश्मी?

आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर या सिनेमाची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. जगभरात या सिनेमाने १३०० कोटींचा टप्पा पूर्ण केला. अशी कमाई करणारा तो पहिला बॉलीवूड चित्रपट ठरला. संपूर्ण जगभरात या सिनेमाची चर्चा झाली. सिनेमाच्या शेवटी रेहमान डकैतला हमजाने मारल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आत पुढे काय होणार, अशी उत्सुकता प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाली आहे. लवकरच या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

धुरंधर: द रिव्हेंज, असे या चित्रपटाचे नाव आहे. रणवीर सिंह प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. 'धुरंधर'मध्ये बडे साहब, असा उल्लेख सतत केला जात होता. पण, बडे साहब म्हणजे नेमके कोण, याबद्दल काही माहिती समोर आली नव्हती. काही दिवसांपूर्वी 'धुरंधर द रिव्हेंज'चा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. त्यामध्ये रेहमान डकैतच्या मृत्यूनंतर हमजा बदला घेण्यासाठी ल्यारीमध्ये जातो. हा टीझर पाहिल्यानंतर मेजर इक्बाल आणि त्याचा बॉस बडेसाहब यांच्याविरोधात तो लढणार असल्याचा अंदाज येतो. आता धुरंधर या चित्रपटाच्या दुसर्या भागात कोणते कलाकार प्रमुख भूमिकांत दिसणार, अशी सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. दुसऱ्या भागात पहिल्याच भागातील अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. त्यामध्ये रणवीर सिंह, अर्जुन रामपाल, संजय दत्त, आर. माधवन, सारा अर्जुन, दानिश पांडोर, राकेश बेदी हे कलाकार दिसणार आहेत. तसेच, राज जुत्शी 'धुरंधर'च्या दुसऱ्या भागात दिसणार असल्याचे म्हटले जात आहे. ते पाकिस्तानी जनरलची भूमिका साकारणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्याबरोबरच दिग्दर्शक आदित्य धर यांची पत्नी व लोकप्रिय अभिनेत्री यामी गौतम कॅमिओ करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या सगळ्यात एका नावाने लक्ष वेधून घेतले आहे. हे नाव म्हणजे इमरान हाश्मी हे आहे. lerter bowd चित्रपटांतील कलाकारांच्या नावाची यादी दिली आहे. यादीतील मुख्य कलाकारांमध्ये इमरान हाश्मीचे नाव लिहिले आहे. मात्र, त्यांच्या भूमिकांबद्दल कोणतीही माहिती उघड केलेली नाही. इमरान हाश्मी या चित्रपटात कोणती भूमिका साकारणार याबद्दलही चर्चा होताना दिसत आहे. तसेच, बडे साहब ही भूमिका इमरान हाश्मी साकारणार का, अशी उत्सुकताही प्रेक्षकांच्या मनात असल्याचे दिसत आहे. एकाने लिहिले, इमरानची कास्टिंग करणे हा उत्तम निर्णय आहे. तो टॅलेंटेड अभिनेता आहे. मी नुकताच 'हक' चित्रपट पाहिला. त्याने उत्तम काम केले आहे. आणखी एकाने लिहिले, इमरान हाश्मी बडे साब असणार या कल्पनेनं मला आनंद झाला आहे. अशा अनेक कमेंट्स करत चाहत्यांनी इमरान हाश्मी बडे साहब या भूमिकेत दिसणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. दरम्यान, धुरंधर या पहिल्या भागाने जगभरात १३०० कोटींची कमाई केली. आता धुरंधर द रिव्हेंज १९ मार्चला प्रदर्शित होणार आहे.

# आजीच्या मतभेदांमुळे अगस्त्य नंदाचं होतंय नुकसान?

ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेत्री जया बच्चन त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखल्या जातात. त्यामुळे काही वेळा त्यांना टीकेचाही सामना करावा लागतो. अशातच आता त्यांनी पती अमिताभ बच्चन व नातू अगस्त्य नंदा यांच्याबद्दल सांगितलं आहे. जया यांनी त्यांचा नातू अगस्त्य जर या क्षेत्रात मोठं नाव कमावणार असेल, तर त्याला कोणीच थांबवू शकत नाही, असं म्हटलं आहे. यावेळी त्यांनी अमिताभ यांच्यावर माध्यमांनी घातलेल्या १५ वर्षांच्या बंदीबद्दलही भाष्य केलं. बच्चन कुटुंबीयांचा अभिनय क्षेत्रातील वारसा आता अगस्त्य त्यांच्या घरातील तीन पिढ्या पुढे नेत आहेत. त्यामुळे अगस्त्यला घरातूनच अभिनयाचं बाळकडू मिळालं आहे. अलीकडेच त्याची मुख्य भूमिका असलेला पहिला चित्रपट प्रदर्शित झाला. अगस्त्यच्या 'इक्कीस' या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाला. यापूर्वी अगस्त्यने 'द अर्चिज'मधून बॉलीवडमध्ये पदार्पण केलेलं. त्यामुळे आता जया त्यांच्या नातवाबद्दल नेमकं काय म्हणाल्या याबद्दल जाणून घेऊ... अगस्त्यच्या ओटीटीवर प्रदर्शित झालेल्या 'द आर्चिज' आणि थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या 'इक्कीस' या चित्रपटांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. जया यांच्या माध्यमांबरोबर असलेल्या संबंधांमुळे लोकांनी या चित्रपटांना प्रतिसाद दिला नसल्याचं म्हटलं जात. आता त्यावर भाष्य करताना जया म्हणाल्या, पृथ्वीवरील कुठलीही शक्ती माझ्या नातवाचं नशीब बदलू शकत नाही. जर अगस्त्य मोठा स्टार होणार असेल, तर त्याला कोणीच अडवू शकत नाही. जया यांनी यावेळी अमिताभ यांचं उदाहरण दिल. जया म्हणाल्या, करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना त्यांना माध्यमांनी १५ वर्षांसाठी बॅन केलं होतं; पण म्हणून काही त्याचा त्यांच्या करिअरवर परिणाम झाला का? पुढे माध्यमांशी असलेले त्यांचे संबंध आणि नातू अगस्त्य यांबद्दल त्या म्हणाल्या, अगस्त्यचे माध्यमांबरोबर वेगळे संबंध असतील, त्याची त्यांच्याबरोबर वेगळी ओळखही असेल. या गोष्टीचं माझ्याशी काहीही घेणंदेणं नाही. माझे वाद वेगळे आहेत. काही दिवसांपूर्वी माध्यमांशी संवाद साधताना जया यांनी अगस्त्यचं कौतुक केलं होतं. त्या म्हणालेल्या, सुदैवानं अगस्त्य खूप पटकन गोष्टी आत्मसात करतो. नवीन गोष्टी शिकायला त्याला वेळ लागत नाही. त्याचे आई-वडील कलाकार नाहीयेत. त्यामुळे तो त्याच्या आजी-आजोबांवर आणि मामाकडून मार्गदर्शन घेतो. मी फार कोणाचं कौतुक करत नाही. अगदी माझ्या मुलांचं किंवा नातवंडांचंही नाही.







## चित्रपटाच्या सेटवर पहिली भेट, तीन वर्ष डेटिंग

# ....अखेर रश्मिकाचा झाला 'विजय'

सध्या मनोरंजनविश्वात एकच चर्चा आहे ती म्हणजे रश्मिका आणि विजय देवरकोंडा या नवोदित जोडप्याची. अभिनेत्री रश्मिका आणि अभिनेता विजय ही दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील नावाजलेली नावं आहेत. या सेलिब्रिटी कपलची फिल्म्समधील केमिस्ट्री अनेकांना आवडते. आता खऱ्या आयुष्यातही ते एक झाले. २६ फेब्रुवारी रोजी उदयपूरमध्ये लग्न करून विजय रश्मिकाने आयुष्यातील एका नवीन अध्यायाला सुरुवात केली. मात्र, त्यांच्या प्रेमकहाणीला कशी सुरुवात झाली जाणून घेऊ...

विजय आणि अभिनेत्री रश्मिकाची लव्हस्टोरी फारच फिल्मी आहे. मैत्रीतून सुरू झालेलं हे नातं हळूहळू प्रेमात बदललं आणि अनेक वर्षे त्यांनी ते अतिशय खासगी ठेवणं पसंत केलं. रिपोर्टनुसार, विजय आणि रश्मिकाची पहिली भेट ही २०१८ साली आलेल्या 'गीता गोविंदम' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान झाल्याचं सांगण्यात येतं. पडद्यावरील त्यांची ऑनस्क्रिन केमिस्ट्री अनेकांना भावली. यानंतर, ही जोडी दक्षिण चित्रपटसृष्टीतील हिट जोड्यांपैकी एक म्हणून ओळखली जाऊ लागली. मग बऱ्याचदा त्यांच्या नात्याबद्दल अनेक बातम्या समोर येऊ लागल्या, पण दोघांनीही कधीही त्यावर प्रतिक्रिया दिली नाही. गेल्या ३ वर्षांपासून हे दोघं एकमेकांना डेट करत असल्याचंही सांगण्यात येतं. इतकंच नाही तर,जवळपास सहा महिन्यांपूर्वीपर्यंत, देवेराकोंडा आणि रश्मिका मंदान्ना एकाच ठिकाणचे फोटो शेअर केले होते. ज्यामुळे चाहत्यांना ही जोडी केवळ पडद्यावरच नाही तर प्रत्यक्ष आयुष्यातही खास असल्याची जाणीव होऊ लागली. अनेकदा विजय आणि रश्मिका विमानतळावर, फॅमिली फंक्शनमध्ये एकत्र दिसले. मात्र प्रत्येक वेळी त्यांनी आम्ही फक्त चांगले मित्र आहोत असंच सांगितलं होतं. अलिकडेच त्यांच्या साखरपुड्याची बातमी आल्यानंतर विजयच्या हातात अंगठी दिसली होती. तसेच, रश्मिकाने स्वतः एक व्हिडीओ शेअर केला होता, ज्यामध्ये ती तिच्याही बोटात हिऱ्याची अंगठी दिसली होती. आता विजय-रश्मिका आयुष्यभराचे सोबती झाले आहेत.

'गीता गोविंदम' ते रिअल लाईफ कपल

विजय आणि रश्मिकाची प्रेमकहाणी 'गीता गोविंदम' चित्रपटाच्या सेटवर सुरू झाली होती. तब्बल सहा वर्षे हे नाते जगापासून लपवून ठेवल्यानंतर, अखेर २६ फेब्रुवारी रोजी त्यांनी उदयपूरमध्ये लग्नगाठ बांधली. हे लग्न अत्यंत खाजगी स्वरूपाचे होते. अत्यंत साध्या पद्धतीनं हा विवाह सोहळा पार पडला.

## विजय-रश्मिकाच्या लग्नात एक नवा विक्रम



दाक्षिणात्य सुपरस्टार रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांच्या लग्नाची चर्चा केवळ भारतातच नाही, तर जगभरात रंगली आहे. विजय- रश्मिकाच्या लग्नात एक नवा विक्रम प्रस्थापित झालाय. २६ फेब्रुवारी रोजी उदयपूरमध्ये पार पडलेल्या या शाही विवाह सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर येताच लाईक्सचा पाऊस पडला. अवघ्या २४ तासांच्या आत या जोडप्याने टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहलीचा इन्स्टाग्रामवरील सर्वात मोठा विक्रम मोडीत काढला आहे.

कोहलीचा रेकॉर्ड मोडला- २०२४ मध्ये भारताने टी-२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर विराट कोहलीने शेअर केलेल्या फोटोला जवळपास २२.८ मिलियन लाईक्स मिळाले होते, जो आतापर्यंतचा भारतातील सर्वाधिक लाईक्स मिळवणारा फोटो होता. मात्र, रश्मिका मंदानाच्या लग्नाच्या पोस्टने हा आकडा पार केला. रश्मिकाच्या वैयक्तिक पोस्टला २३ मिलियनपेक्षा जास्त लाईक्स मिळाले आहेत, तर विजय देवरकोंडाच्या पोस्टलाही १८ मिलियनहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. या दोघांच्या पोस्ट लाईक्सचे आकडे एकत्र केले तर, दोघांच्या पोस्टला मिळून ४० मिलियनहून अधिक लाईक्स आहेत.

बॉलिवूड कपल्सलाही टाकले मागे- 'विरोश'च्या या लग्नाच्या फोटोंनी बॉलिवूडमधील सर्व मोठ्या लग्नांचे रेकॉर्ड्स मोडले आहेत. यापूर्वी कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या लग्नाच्या फोटोंना १५.८ मिलियन लाईक्स मिळाले होते. तसेच आलिया-रणबीर (१४ मिलियन) आणि कतरिना-विकी (१२.६ मिलियन) यांसारख्या लोकप्रिय जोड्यांनाही रश्मिका आणि विजयने मागे टाकले आहे. एकूणच रश्मिका-विजयवर चाहते किती प्रेम करतात, हेच यावरुन पाहायला मिळतं.

सध्या रश्मिका-विजय हे जोडपे हैदराबादला रवाना झाले आहे. हैदराबादमध्ये या दोघांनी रिसेप्शन आयोजित केले आहे. या विक्रमी लाईक्समुळे रश्मिका आणि विजयची लोकप्रियता सध्या शिखरावर असून, 'विरोश' ही जोडी खऱ्या अर्थाने डिजिटल विश्वाची 'किंग' आणि 'क्विन' ठरली आहे. राजकुमार पुढे त्याच्या दुसऱ्या चरित्रपटाबद्दल माजी क्रिकेटपटू सौरव गांगुली यांच्या जीवनावर आधारित असलेल्या चित्रपटाबद्दल म्हणाला, आता ट्रान्सफॉर्मेशनचा टप्पा सुरू झाला आहे. वाढलेलं वजन कमी करून, 'गांगुली मोड'मध्ये जाण्याची वेळ आली आहे. तुमचं मनोरंजन करण्यासाठी मी नेहमीच माझ्या कामातून सर्वोत्तम प्रयत्न करत राहीन.